PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Hasari
Year: 1997

Song: Nabh Nile Ghan Nile
Lyricist:

नभ निळे घन निळे
जल निळे थेंब निळे
टप टप टप थेंब पडला
टप टप टप थेंब पडला
हाती त्याचा मोती झाला
नभ निळे घन निळे
जल निळे थेंब निळे

वाऱ्यासंगे धुंद घुमला
गंध त्याचा माती आला
हो वाऱ्यासंगे धुंद घुमला
गंध त्याचा माती आला
पानोपानी तो झिरपला
चंद्र सुर्ये तोची दिसला
पानोपानी तो झिरपला
चंद्र सुर्ये तोची दिसला
टप टप टप थेंब पडला
टप टप टप थेंब पडला
पानी त्याचा मोती झाला
नभ निळे घन निळे
जल निळे थेंब निळे

झुळ झुळ झुळ झऱ्यासंगे
गावोगावी तो पसरला
झुळ झुळ झुळ झऱ्यासंगे
गावोगावी तो पसरला
पिवळया पिवळया मुकुटामध्ये
हिरा म्हणूनी तो शोभला
पिवळया पिवळया मुकुटामध्ये
हिरा म्हणूनी तो शोभला
टप टप टप थेंब पडला
टप टप टप थेंब पडला
भाळी त्याचा मोती झाला
नभ निळे घन निळे
जल निळे थेंब निळे

रूणझुणते बैलजोडी
सांजवेळी परतोनी
रूणझुणते बैलजोडी
सांजवेळी परतोनी
मनामनांच्या गाभाऱ्यात
ज्योत बनूनी तो चमकला
टप टप टप थेंब पडला
टप टप टप थेंब पडला
गाली त्याचा मोती झाला
नभ निळे घन निळे
जल निळे थेंब निळे
टप टप टप थेंब पडला
टप टप टप थेंब पडला
हाती त्याचा मोती झाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*